

# कोकण इतिहास परिषद

(जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोंई संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता. कल्याण येथे संपन्न झालेल्या कोकण इतिहास परिषदेच्या ९व्या अधिवेशनात सादर झालेल्या वेचक संशोधन प्रपत्रांचा संग्रह )

शोधनिबंध संग्रह (खंड-९)

आनंद विश्व गुरुकुल ज्येष्ठ महाविद्यालय, ठाणे
आणि
कोकण इतिहास परिषद

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# कोकण इतिहास परिषद

## शोधनिबंध संग्रह (खंड-९)

(जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता. कल्याण येथे संपन्न झालेल्या कोकण इतिहास परिषदेच्या ९व्या अधिवेशनात सादर झालेल्या वेचक संशोधन प्रपत्रांचा संग्रह )

प्रमुख संपादक

**श्री.रवींद्र दत्तात्रय लाड**

संपादन मंडळ

**डॉ.अरुण जोशी**

**श्री.पद्माकर शिरवाडकर**

**प्रा.सौ.भारती जोशी**

**प्रा.सौ.विद्या प्रभू**

न्यू मॅन पब्लिकेशन

www.newmanpublication.com

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | डॉ. आंधळे एस.बी. | नारायण मेघाजी लोखंडेंनी दीनबंधु पत्रातून केलेली मुंबईतील जनजागृती | १४६ |
| १३ | प्रा. प्रेरणा एस. राऊत | कोकणातील आदिवासी लोकसंस्कृतीत भगताचे स्थान | १५० |
| १४ | प्रा. युवराज सुभाष जाधव | पोलादपूरचा शिमगोत्सव | १५५ |
| १५ | प्रा. कविता हरिश्चंद्र मांजे | रायगड आणि ठाणे जिल्ह्यातील जत्रोत्सव | १६० |
| १६ | प्रा. कैलास कळकटे | कोकणातील दशावतार लोकनाट्य | १६८ |
| १७ | प्रा. राजाराम वामन कापडी | मुरबाडचा आधुनिक राजकीय इतिहास | १७२ |
| १८ | प्रा. सौ. गीता विशे | मुरबाडमधील पर्यटन अडचणी व उपाय | १७६ |
| १९ | श्रावण अहिलाजी केळकर<br>मार्गदर्शक प्रा. लक्ष्मण नारायण भोईर | जीवनदीप शैक्षणिक संस्थेचा कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान व इतिहास | १८२ |
| २० | अनिकेत भगवान पडवळ (बी.ए.प्र.वर्ष)<br>मार्गदर्शक डॉ. विद्या प्रभू | अनपेक्षित साधने - अपेक्षित इतिहास दैनंदिन वर्तमानपत्राच्या एका वृत्तपत्रावरुन | १८६ |
| २१ | ऐश्वर्या जगदाळे,<br>योगिता भातणे,<br>कल्पेश टोकारे (बी.ए.तृ.वर्ष) | Bombay Society for The Prevention of Cruelty to Animals | १८८ |




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

१६.

# कोकणातील 'दशावतार' लोकनाट्य

**प्रा.कैलास कळकटे**
मराठी विभाग प्रमुख,
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
खर्डी, ता.शहापूर, जि. ठाणे.

संस्कृती ही आदिम काळापासून माणसाच्या उत्क्रांतीतून आकाराला येत गेली. माणूस जीवन उत्क्रांत होताना त्याला सगळ्या बाजूंनी सुरक्षित करण्यासाठी जे काही करत जातो त्यातून 'संस्कृती' आकाराला येते. लोकजीवनात आढळणा-या चालीरीत,परंपरा, रुढी जेव्हा मनोरंजनाच्या स्वरुपात एका पिढीकडून दुस-या, दुस-याकडून तिस-याकडे मौखिक स्वरुपात लोकगीत, लोककला, लोकनृत्य, लोकनाट्य इ. जात राहतात आणि त्यातूनच 'लोकसंस्कृती' आकाराला येते. ही लोकसंस्कृती विशिष्ट प्रदेशातील लोकांच्या धारणा, गरजा, जगण्याविषयीचे समज, श्रद्धा इ. आकाराला येते. त्यामुळे प्रदेशनिहाय लोकसंस्कृती वेगवेगळ्या स्वरूपात आढळते.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व मुंबई या पाच जिल्ह्यांच्या प्रदेशाला कोकण म्हणून ओळखले जाते. हा प्रदेश डोंगरद-यात, नद्या, जंगलात वसलेला आहे. त्यामुळे प्राचीन काळात अर्थार्जनासाठी व उपजीविकेच्या साधनांसाठी या प्रदेशातील लोक प्रामुख्याने शेती, डोंगरद-या, नदी, तलाव, समुद्र यावर अवलंबून होते. त्यामुळे निसर्गाच्या सानिध्यात वावरणा-या या लोकांनी स्वतःची अशी लोकसंस्कृती आकाराला आणली. तिलाच कोकणची संस्कृती म्हणून ओळखले जाते. कोकणाची लोकसंस्कृती म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर येतो तो 'दशावतार'.

**कोकणातील दशावतार लोकनाट्य -** कोकणातील दशावतार या लोकनाट्याला खूप मोठा इतिहास आहे. इ.स. १७२८ मध्ये शामजी नाईक काळे यांनी दशावताराचा पहिला प्रयोग आडिवरे इथे महाकालीच्या मंदिरामध्ये केल्याची नोंद मिळते. त्यांनी फक्त या कलेचा जीर्णोद्धार केला असावा असे वाटते कारण दशावताराचे उल्लेख रामदासस्वामींच्या दासबोध या ग्रंथामध्ये आढळतात. रामदासस्वामी दशावताराबद्दल असे लिहितात की -

"खेळता नेटके दशावतारी
तेथे येती सुंदर नारी



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

नेत्र मोडिती कलाकुसरी
परी ते अवघे धटिंगण''

(दासबोध, ६-८,११)

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रामुख्याने दशावतार हे लोकनाट्य अस्तित्त्वात असल्याचे आढळून येते. आजही अनेक दशावतारी मंडळे तिथे कार्यरत आहेत.

**दशावतार -** दशावतार म्हणजे विष्णूने जे दहा अवतार धारण केले ते मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, कलंकी व बुद्ध यापैकी पहिली चार रूपे मानवी नाहीत. ती प्राणी रुपे आहेत. नववा अवतार कलंकी व दहावा बुद्ध हे दोन अवतार 'दशावतारात' दाखवले जात नाहीत. ती सर्व पात्रे प्रत्यक्ष सभा मंडपात (रंगमंचावर) येत नाहीत. त्यातील काही प्रत्यक्ष रंगमंचावर येतात तर काहींचा उल्लेख केला जातो.

पूर्वरंगातील संकासूर, भटजी, गणपती, रिद्धी-सिद्धी, सरस्वती, ब्रह्मा, विष्णू ही पात्रे आणि उत्तरंगात रामायण, महाभारत या पुराणांमधील आख्यान असे दशावतार या लोकनाट्याचे स्वरूप असते. कोकणातील देवळी, लिंगायत आणि गुरव समाजाचे लोक गावोगावी जाऊन दशावतार सादर करतात. दशावतारी खेळाचा काळ साधारणपणे कार्तिक शुद्ध दशमीपासून ते वैशाख शुद्ध पंचमीपर्यंतचा (साधारणपणे ऑक्टोंबर - नोव्हेंबर ते एप्रिल - मे) या काळात रात्री दहा अकरा वाजता सुरू झालेला दशावतारी खेळ पहाट होईपर्यंत चालत असे. परंतु आता तीन ते चार तासात हा खेळ संपतो.

**दशावताराचे सादरीकरण -** दशावतार या लोकनाट्याला संहिता नसते. जी कथा या खेळासाठी सादर करावयाची आहे त्याचे प्रमुख सूत्र या नाट्याचा प्रमुख सूत्रधार किंवा मालक सर्व कलाकारांना ती कथा समजावून सांगतो. मग ही सगळी पात्रे उत्स्फूर्तपणे हे नाटक प्रेक्षकांसमोर सादर करतात. या लोकनाट्यात सूत्रधाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. हे लोकनाट्य पूर्वरंग व उत्तररंग या दोन भागांत विभागलेले असते. साधारणपणे पुढीलप्रमाणे दशावतार हे लोकनाट्य सादर केले जाते.

(पूर्वरंग)

प्रथम गणपतीला आवाहन

↓

नंतर रिद्धी-सिद्धीसहित गणपतीचे रंगमंचावर आगमन

↓



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

मागोमाग सरस्वतीचे आगमन

↓

गणपतीचे आवाहन संपले की सूत्रधार सरस्वतीची पूजा करतो. सरस्वती त्याला आशीर्वाद देते. त्यानंतर तो आज कोणते नाटक सादर होणार आहे याची कल्पना प्रेक्षकांना देतो

↓

प्रत्यक्ष खेळाला सुरुवात

↓

२

संकासुराचा वध करुन (पूर्वरंग संपतो)

↓

(उत्तररंग)

दशावताराच्या उत्तररंगात एखादे आख्यान नाट्यरूपात सादर केले जाते. यालाच खेळ म्हणण्याची प्रथा आहे. साधारणपणे रामायण किंवा महाभारतातील एखाद्या विषयाची किंवा घटनेची निवड केली जाते. हे नाटक संपल्यावर प्रेक्षकांमध्ये ताळी फिरविली जाते आणि मग प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे त्यात पैसे टाकतात. गावातील काही लोक कलाकारांना खास बक्षिसी देतात.

दशावतारातील पेटारा - दशावतारात पेटा-याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हा पेटारा बांबूच्या काड्यापासून बनविलेला असतो. ह्या पेटा-याचे 'स्थानिक पेटारे' व 'फिरतीचे पेटारे' असे दोन प्रकार असतात. यातील स्थानिक पेटारे हे गावाच्या मालकीचे असतात. तर फिरतीचे पेटारे हे बहुतांश वैयक्तिक मालकीचे असतात. पेटारे गावाच्या श्रद्धेचा विषय असतात. कारण मुखवट्यांपासून वस्त्रांपर्यंत सारे सामान या पेटा-यात असते. त्या अर्थाने पेटारा म्हणजे प्रतिसृष्टीच असते.

दशावताराची ठळक वैशिष्ट्ये -

१. प्राचीन लोकनाट्य प्रकार
२. दशावतार या लोकनाट्यात पेटारा ही महत्त्वाची संकल्पना आहे.
३. दशावतारी नाट्याची लिखित संहिता नाही.
४. संवादाची निर्मिती प्रत्यक्ष नाट्यातूनच आकाराला येते.
५. नाट्यात वाद्य, संगीत यांचा प्रभावी वापर केला जातो.
६. राक्षस पात्रांची रंगभूषा अधिक भडक तर देवांची सात्त्विक स्वरुपाची असते.



Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College + Jeevandeep
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

७. दोन पात्रांच्या युद्धाच्यावेळी ते जे काही आपल्या पदलालित्यातून सादर करतात त्याला लंगर असे म्हणतात.

८. वैशिष्ट्यपूर्ण रंगभूषा, उत्स्फूर्त संवाद आणि त्यानुसार होत जाणारा काहीसा भडक, परंतु पेक्षकांना आकर्षित करणारा अभिनय अशीही दशावताराची प्रभावी त्रिसूत्री आहे.

अत्यंत प्रभावी असणारा हा लोककला प्रकार आधुनिक काळानुसार बदलत आहे. तरीही आज त्याला पाहिजे तेवढे व्यापक रूप मिळालेले दिसत नाही. याच लोककला प्रकाराच्या जवळ जाणारा कर्नाटकातील 'यक्षगान' मात्र सातासमुद्रापलीकडे गेलेला दिसतो. त्याचा वेगळ्याप्रकारे शोध अभ्यासकांना घेता येईल.

❑❑❑



Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601